# माणगांव नगरपंचायत माणगांव

मु.पो.ता.माणगांव,जि.रायगड.

Email-nagarpanchayatmangaon@gmail.com, ऑफिसफोन-02140-263056

क्र.मानपं/ आरोग्य/ /2024-25 दिनांक- / /2025

## आरोग्य विभाग कामाची माहिती
## (स्वच्छ भारत मिशन)

| अ.क्र | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| १ | एकूण दैनंदिन कचरा निर्मिती | 9.56 टन प्रति दिन |
| २ | एकूण कचरा संकलन | 9.56 टन प्रति दिन १००% |
| ३ | एकूण कचरा वर्गीकरण | 80 % |
| ४ | एकूण ओला कचरा | 5 टन |
| ५ | एकूण सुका कचरा | 4 टन |
| ६ | ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया | पिट कंपोस्टिंग व्दारे प्रक्रिया करणेत येते. |
| ७ | सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया | घनकचरा प्रक्रिया केंद्रावर असलेल्या सुका कचरा शेड (MRF) द्वारे सुका कचरा प्रक्रिया करण्यात येते. |
| ८ | प्लास्टिक कचरा | सिंगल युज प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती करणेत येत असून स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहीर आवाहन देणे, बॅनर लावणे, जिंगल व्दारे जनजागृती व पत्रके वाटप करण्यात आली आहे. व्यापारी वर्गाची मिटींग घेणे, कापडी पिशवी करताना करणेत आली आहे. सिंगल युज प्लास्टिक चा वापर करताना आढळल्यास दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. |
| ९ | FSTP प्रकल्प | माणगाव नगरपंचायत करीता ५ के.एल.डी क्षमतेचा FSTP प्रकल्प मंजूर झाला असून सदरचा प्रकल्प उभारणी केली असून प्रकल्प योग्य रित्या चालू आहे. |
| १० | घनकचरा व्यवस्थापन वापरकर्ता शुल्क | शासन निर्णयानुसार घनकचरा वापरकर्ता शुल्क चतुर्थ आकारणी मध्ये प्रस्तावित करण्यात आले आहे. |
| ११ | कचरा संकलन, रस्ते नाले सफाई व कचरा प्रक्रियेकरिता मनुष्यबळ सेवा | कचरा संकलन, रस्ते नाले सफाई व कचरा प्रक्रियेकरिता एकूण २८ कामगार सेवा तत्वावर घेण्यात आले आहेत. |
| १२ | एकूण कचरा संकलन घंटागाड्या | माणगाव नगरपंचायत करीता ६ घंटागाड्या आणि २ एप्पे अश्या एकूण ८ घंटागाड्या कचरा संकलनाकरिता वापरण्यात येत आहेत. |
| १३ | DPR 1 ची अंमलबजावणी | १०० % |
| १५ | SBM 1.0 अंतर्गत घनकचरा प्रक्रिया केंद्रावर करणेत आलेली कामे. | पिट कंपोस्टिंग,MRF व अनुषंगिक यंत्र सामुग्री. |
| १ .ओल्या कचरा प्रक्रिया करणेकामी पिट कंपोस्टिंग व्दारे प्रक्रिया करण्यात येते. | | |
| २.सुका कचऱ्याकरिता ०५ कंपार्टमेंट असलेले परमनंट शेड | | |
| ३. बांधकाम कचरा (C& D) शेड | | |
| ४.CCTV (जिल्हा नियोजन समिती रायगड अलिबाग महाराष्ट्र सुवर्ण जयंती महाभियान अंतर्गत माणगाव शहराकरिता CCTV यंत्रणा कार्यान्वित करणेत आली आहे..) | | |

SWACHH SURVEKSHAN

| | | |
|---|---|---|
| ५.ॲटो टिप्पर 2 खरेदी | | |
| ६. बेलिंग मशीन | | |
| ७. हातगाड्या १७ नग | | |
| ८. ट्वीन बीन ४० नग | | |
| ९. स्क्रिनिंग मशीन - १ नग | | |
| १०. श्रेडर मशीन - १ नग | | |
| ११. पाण्याचे टँकर - १ नग | | |
| १२.नागरिकांमध्ये IEC टिम मार्फत स्वच्छतेची जनजागृती | | |
| १३. | स्वच्छ भारत अभियान (नागरी )२.० अंतर्गत मोबाईल टॉयलेट खरेदी | ५ - ५ सीट चे १ मोबाईल टॉयलेट खरेदी करणेत आले आहेत. |
| १४. | स्वच्छ भारत अभियान (नागरी ) २.० अंतर्गत घनकचरा प्रक्रिया केंद्रावर असलेल्या जुन्या कचऱ्यावर (पुराचा कचरा) प्रक्रिया | घनकचरा प्रक्रिया केंद्रावर असलेल्या 15740 मे.टन कचऱ्यावर शात्रोक्त रित्या प्रक्रिया करणेकामी मंजुरी करिता प्रस्तावित आहे. |
| १५. | स्वच्छ भारत अभियान (नागरी ) २.० अंतर्गत मलनिस्सारण प्रकल्प (STP) सविस्तर प्रकल्प अहवालाबाबत सध्यस्थिती. | माणगाव नगरपंचायतीच्या मलनिस्सारण प्रकल्प अहवाल नगरोत्थान महाभियान अंतर्गत शासन मंजूरीस्तव सादर करणेत आले आहे. |
| १६. | स्वच्छ सर्वेक्षण मानांकने (५० हजार ते १ लाख लोकसंख्या वर्गवारी ) | 1) स्वच्छ सर्वेक्षण २०२१ मध्ये माणगाव शहराला राज्य स्तरावर 944 वे मानांकन प्राप्त झाले होते तसेच हागणदारी मुक्त शहर म्हणून ODF+ मानांकन प्राप्त झाले आहे.<br>2) स्वच्छ सर्वेक्षण २०२२ मध्ये माणगाव शहराला राज्य स्तरावर 364 वे मानांकन प्राप्त झाले होते.<br>3) स्वच्छ सर्वेक्षण २०२३ मध्ये राज्यामध्ये 90 वा क्रमांक प्राप्त झाला आहे. तसेच हागणदारी मुक्त शहर म्हणून ODF+ मानांकन प्राप्त झाले आहे. |
| १७. | वैयक्तिक शौचालय लाभ देण्यात आलेले कुटुंब संख्या | माणगाव शहरातील एकूण 183 कुटुंबाना वैयक्तिक शौचालय चा लाभ देण्यात आला आहे. |
| १८. | भटके कुत्रे निर्बिजीकरण | निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. |
| १९. | शहरातील भिंती तसेच शौचालय रंगरंगोटी करणे. | शहरातील भिंती / शौचालय रंगरंगोटीचे काम पुर्ण झाले आहे. |

**मुख्याधिकारी**
**माणगाव नगरपंचायत**

# माणगांव नगरपंचायत माणगांव

मु.पो.ता.माणगांव,जि.रायगड.

Email-nagarpanchayatmangaon@gmail.com, ऑफिसफोन-02140-263056

क्र.मानपं/ आरोग्य/ /2024-25 दिनांक- / /2025

## विभाग टिप्पणी

आरोग्य विभाग प्रमुख-१, स्वच्छता निरिक्षक -१ , **सिटी को ऑर्डिनेटर**-१, मुकादम -**२** व सफाई कर्मचारी -**१९,** असे कर्मचारी दैनंदिन काम करत असतात

माणगाव नगरपंचायत हद्दीमध्ये एकूण १७ प्रभाग असून दैनंदिन निर्माण होणारा ओला कचरा 5 टन व सुका कचरा 4 टन असा एकूण 9 टन कचरा १७प्रभागामधील घंटागाड्यांमार्फत संकलन केला जातो. शहरातील हॉटेल वेस्ट चा कचरा संकलन करण्यासाठी स्वतंत्र घंटागाडी पाठवली जाते. तसेच शहरामध्ये चिकन वेस्ट कचऱ्यासाठी स्वतंत्र दोन घंटागाड्यांमार्फत संकलन केला जातो. तसेच व्यापारी क्षेत्रामध्ये दिवसातुन २ वेळा घंटागाडी पाठवली जाते.

शहरामधील १७ प्रभागामधील रहिवासी क्षेत्रामध्ये १ वेळ रस्ते सफाई तसेच व्यापारी क्षेत्रामध्ये २ वेळा रस्ते सफाई करण्यात येते. तसेच नगरपंचायत मालकीचे सामुदायिक व सार्वजनिक शौचालयाची साफसफाई दिवसातून १ वेळ केली जाते. व शहरामधील नियोजनाप्रमाणे प्रभागामधील दैनंदिन गटर सफाई केली जाते. तो कचरा उलण्यासाठी स्वतंत्र गाडीची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच ग्रास कटर मशीनद्वारे गवत साफ सफाई व १७ प्रभागामध्ये फॉग मशीन व स्प्रे मशीन द्वारे जंतूनाशक फवारणी केली जाते. तसेच शहरामधील नागरीकांच्या मागणीनुसार सेप्टीक टँक मैला उपसा करण्यासाठी ३००० लीटर क्षमतेच्या मैला व्हॅक्युम एम्पीटर (मैला गाडी) पाठविण्यात येते.

१७ प्रभागामधील निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारण्यात आला आहे. सदर प्रकल्पात पुढीलप्रमाणे प्रक्रिया करण्यात येते.सुक्या कचऱ्यासाठी (MRF) कायमस्वरुपी शेड उभारण्यात आली आहे. त्यामध्ये वेगवेगळ्या कंपार्टमेंट मध्ये वर्गीकृत कचरा ठेवण्यात येत असून पुढील प्रक्रिया करण्यात येते. तसेच ओल्या कचऱ्यावरती पिट कंपोस्टिंग द्वारे प्रक्रिया करुन खतनिर्मिती करण्यात येत आहे.

शहरातील निर्माण होणारा बांधकाम कचरा (विटा, दगड, माती, कॉक्रिट, लाकूड इ) कचरा वेगळ्या वाहनामधून संकलन करणेत येत असून बांधकाम कचरा संकलन शेड मध्ये वर्गीकृत ठेवण्यात येत आहे. तसेच सदर कच-याचा वापर भुभरावाकरिता करण्यात येतो. तसेच सॅनिटरी पॅड्स नॅपकीन, हगीज, मास्क इ. प्रकारचा कचऱ्यावरती इन्सीरेशन मशीन द्वारे प्रक्रिया केली जाते.

**मुख्याधिकारी**
**माणगाव नगरपंचायत**